

# रोहितचा मेसेज स्पष्ट होता, आऊट झालो तरी हरकत नाही -के.एल.राहुल

**कानपूर । वृत्तसंस्था**

भारत विरुध्द बांगलादेश कसोटीत भारतीय संघाने आक्रमक फलंदाजीने धावा करत अनेक विक्रम आपल्या नावे केले आहेत. कानपूर कसोटीतील पहिले ३ दिवस पावसामुळे खेळ होऊ शकला नाही. त्यामुळे हा कसोटी सामना ड्रॉ होण्याची चिन्हे होती. पण भारताने चौथ्या दिवशीचा खेळा सुरू झाल्यानंतर झटपट बांगलादेशला ऑल आऊट केले आणि फलंदाजीसाठी उतरल्यानंतर आक्रमक पवित्रा घेत भारताने बांगलादेशच्या गोलंदाजांची धुलाई केली. इतकेच नव्हे तर यासह भारताने सर्वात जलद कसोटीत ५० आणि १०० धावा करण्याचा विक्रम आपल्या नावे केला.

कानपूर कसोटीच्या पाचव्या दिवसाचा खेळ सुरू होण्यापूर्वी बोलताना, राहुलने सांगितले की, मर्यादित वेळ शिल्लक असतानाही रोहितच्या संदेशाने संघाला सकारात्मक दृष्टिकोन स्वीकारण्यास प्रेरित केले. रोहित शर्माबद्दल बोलताना केएल म्हणाला सुरुवातीपासूनच संदेश अगदी स्पष्ट होता. पावसामुळे, खराब हवामानामुळे आधीच बरेच दिवस वाया गेले होते. परंतु आम्ही उरलेल्या वेळेत काय करू शकतो यावर संपूर्ण लक्ष होते. आम्ही खूप लवकर काही विकेट गमावले पण रोहित शर्माचा मेसेज खूप स्पष्ट होता. आपण आऊट झालो तरी काही हरकत नाही, पण आपण विजयासाठी प्रयत्न केले. रोहित शर्माने चौथ्या दिवशी सहकाऱ्यांना आक्रमक फलंदाजी करण्याच्या सूचना दिल्या होत्या.



# भारताचा बांगलादेशवर मालिका विजय

## ऐतिहासिक विक्रमासह घरच्या मैदानावर २-० ने उडवला धुव्वा

**कानपूर । वृत्तसंस्था**



कानपूरमध्ये टीम इंडियाने असा चमत्कार घडवला जो कसोटी क्रिकेटच्या इतिहासात क्वचितच पाहायला मिळतो. टीम इंडियाने दुसरा कसोटी सामना जिंकून बांगलादेशचा दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेत २-० असा व्हाईटवॉश केला. अशा प्रकारे भारताने घरच्या मैदानावर नवा इतिहास लिहिला आहे. भारताने पहिल्या कसोटीत २८० धावांनी विजय मिळवला होता आणि आता दुसऱ्या कसोटीत बांगलादेशचा ७ गडी राखून पराभव करून मायदेशात मोठी कामगिरी केली. घरच्या मैदानावर टीम इंडियाचा हा सलग १८ वा मालिका विजय आहे.

सलग १८ वा मालिका विजय

मायदेशात सर्वाधिक सलग मालिका जिंकण्याचा विक्रम भारतीय संघाच्या नावावर आहे. या बाबतीत दुसरा क्रमांक ऑस्ट्रेलियाचा आहे, ज्याने घरच्या मैदानावर सलग १० मालिका जिंकण्याचा पराक्रम केला आहे, भारताने गेल्या १२ वर्षांपासून घरच्या मैदानावर एकही कसोटी मालिका गमावलेली नाही. टीम इंडियाने शेवटची कसोटी मालिका २०१२ मध्ये घरच्या मैदानावर गमावली होती. त्यानंतर इंग्लंडने भारतीय संघाचा २-१ असा पराभव केला होता. या मालिकेपासून टीम इंडियाने घरच्या मैदानावर एकही कसोटी मालिका गमावलेली नाही. गेल्या १२ वर्षात भारताने मायदेशात सलग १८ कसोटी मालिकेत विरोधी संघाचा पराभव केला आहे.

कानपूर कसोटीत पहिल्या दिवशी पावसामुळे केवळ ३५ षटकांचाच खेळ होऊ शकला. यादरम्यान बांगलादेशने प्रथम फलंदाजी करताना ३ गडी गमावून १०७ धावा केल्या. पावसामुळे दुसऱ्या आणि तिसऱ्या दिवशी एकही चेंडू टाकता आला नाही, मात्र चौथ्या दिवशी भारतीय गोलंदाजांनी अप्रतिम



गोलंदाजी करत बांगलादेशला २३३ धावांत गुंडाळले. याला प्रत्युत्तर म्हणून भारताने चौथ्या दिवशी डावाची आक्रमक सुरुवात केली आणि कसोटी क्रिकेटच्या इतिहासात सर्वात जलद ५०, १०० आणि २०० धावा करण्याचा पराक्रम केला. भारताने पहिला डाव २८५/९ धावांवर घोषित केला.

दुसऱ्या डावात फलंदाजीसाठी आलेल्या बांगलादेशचा संघ केवळ १४६ धावाच करू शकला, त्यामुळे टीम इंडियाला विजयासाठी ९५ धावांचे लक्ष्य मिळाले. शेवटच्या दिवशी दुसऱ्या सत्रात भारतीय डावाची सुरुवात धमाकेदार झाली पण रोहित शर्मा स्वस्तात पॅव्हेलियनमध्ये परतला. गिलही ६ धावा करून माघारी परतला. यानंतर विराट कोहली आणि यशस्वी जैस्वाल यांनी पदभार स्वीकारला आणि अशा प्रकारे भारताने सामना तसेच मालिकेवर कब्जा केला.

# भारताच्या दोन खेळाडूंमुळे आम्ही कसोटी मालिका गमावली!

## बांगलादेशच्या कॅप्टनने उघडपणे घेतली नावे

**कानपूर । वृत्तसंस्था**

भारताने दुसऱ्या कसोटी सामन्यामध्ये ७ विकेटने दमदार विजय मिळवला आहे. रोहित शर्मा अँड कंपनीने आयडियाची कल्पना करत विजय खेचून आणला. पावसामुळे पहिला, दुसरा आणि तिसरा दिवस वाया गेला होता. मात्र दोन दिवसात भारतीय संघाने कसोटी सामना जिंकला. या विजयासह भारत आणि बांगलादेशमधील दोन कसोटी सामन्यांची मालिका भारताने २-० ने जिंकली आहेत. या पराभवानंतर बांगलादेशचा कर्णधार नजमुल हुसेन शांतो याने भारताच्य दोन खेळाडूंची नावे घेत त्यांना पराभवसाठी जबाबदार ठरवलं आहे.

**नजमुल हुसेन शांतो काय म्हणाला?**

दोन्ही कसोटीमध्ये आम्ही खराब फलंदाजी केली. या परिस्थितीत आम्हाला उत्तम फलंदाजी करण्याची गरज होती. पण तुम्ही आमची फलंदाजी पाहिलीत तर आम्ही ३० ते ४० बॉल खेळलो आणि आऊट झालो. कसोटीमध्ये तुम्ही मैदानावर असताना मोठ्या धावसंख्येचे लक्ष्य ठेवायला हवे. आर. अश्विन आणि रविंद्र जडेजा यांनी खरोखरच चांगली फलंदाजी केली. आम्हाला त्यावेळी एक बॉलिंग युनिट म्हणून विचार करायला



हवा होता की या दोघांच्या विकेट कशा मिळवता येतील. त्या दोघांची भागीदारी आम्हाला चांगलीच महागात पडली. आमच्याकडून मोमिनुल याने ज्या पद्धतीने खेळ केल त्याने पुढे जाण्यास मदत झाली. त्यासोबतच मिराझनेही दोन्ही डावांमध्ये उत्तम गोलंदाजी केल्याचं नजमुल हुसेन शांतो म्हणाला.

बांगलादेशविरूद्धचे भारताने दोन्ही कसोटी सामने जिंकत मालिका जिंकली. पहिल्या कसोटी सामन्यामध्ये अश्विनने शतक आणि जडेजाने अर्धशतक केले होते. त्यासोबतच दोघांनी ११ विकेट घेतल्या होत्या. तर दुसऱ्या कसोटीमध्ये ९ विकेट घेतल्यात. दोघांनीही बॅटींग आणि बॉलिंगमध्ये कमाल कामगिरी केल्याचे पाहायला मिळाले. कसोटी मालिकेनंतर आता भारत आणि बांगलादेशमध्ये तीन सामन्यांची टी-२० मालिका होणार आहे. या मालिकेला येत्या ६ ऑक्टोबरपासून सुरू होणार आहे.



सोनिपथ । लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी सोनिपथ येथे काँग्रेस उमेदवारासाठी प्रचार सभा घेतली यावेळी उत्साही कार्यकर्त्यांना हस्तांदोलन करताना.

# राहुल गांधींचा हल्लाबोल

**सोनीपत ।** भारतीय जनता पार्टी सत्तेसाठी कोणत्याही स्तराला जाण्याची तयारी ठेवते. हरियाणात देखील त्यांनी कोणतीही कसर सोडली नसून कुस्तीपटू विनेश फोगाटसह अन्य खेळाडूंना त्यांच्या नेत्यांनी त्रास दिला असा हल्लाबोल लोकसभेतील विरोधीपक्षनेते राहुल गांधी यांनी सोनीपतमध्ये बोलताना केला. काँग्रेस उमेदवाराच्या प्रचारार्थ घेण्यात आलेल्या सभेत ते बोलत होते.

**विधीलिखित**
सुरेशराव बोरकर, ब्रह्मांड ज्योतिष कार्यालय, रावेर. मो. : ९८५००१५५५८

बुधवार, दि.२ ऑक्टोबर २०२४

*-*-* दैनंदिन राशिभविष्य *-*-*

- मेष - शारीरीक व्यथा ह्या जाणवू लागतील.
- वृषभ - विद्यार्थी वर्गास अति उत्तम दिवस राहील.
- मिथुन - मातृसाठी कार्य करावे लागणार आहे.
- कर्क - नवीन कार्याच्या संधी प्राप्त होतील.
- सिंह - नवीन कामातून आर्थिक लाभ होईल.
- कन्या - सर्व काही मनाप्रमाणे घडणार आहे.
- तूळ - नको ते विचार मनात येणार आहेत.
- वृश्चिक - विवाह योग जुळून येतील.
- धनू - पितृ आरोग्याचे प्रश्न निर्माण होतील.
- मकर - प्रेम प्रकरणे असल्यास जवळीक होईल.
- कुंभ - शारीरीक व्यथा निर्माण होणेची संभावना.
- मीन - संसार कामातच आज वेळ जाईल.

# माझी विश्वासार्हता पणाला लागलीय

## सरन्यायाधीशांनी वकिलांना फटकारले

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

सर्वोच्च न्यायालयात मंगळवारी एका प्रकरणाची सुनाणी सुरू होती. यावेळी सरन्यायाधीश डी वाय चंद्रचूड यांच्या खंडपीठाने न्यायमूर्ती जेबी पार्डीवाला आणि मनोज मिश्रा यांच्यासमवेत न्यायालयीन सुनावणी सुरू केली. त्यावेळी एका वकिलाने खान उत्खननाशी संबंधित प्रकरणाचा उल्लेख केला. मात्र, या सुनावणीवेळी वकिलांनी अनेकवेळा या प्रकरणाचा उल्लेख करत संदर्भ दिला, त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांनी नाराजी व्यक्त केली.

सर्वोच्च न्यायालयासमोरील खान उत्खननाशी संबंधित प्रकरणावरील सुनावणीवेळी वकिलांनी एका प्रकरणाचा दाखला वारंवार दिल्यानंतर सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी म्हटले की, सरन्यायाधीश या नात्याने माझ्याकडे जी काही विवेकबुद्धी आहे, ती तुमच्या पक्षात कधीही वापरली जाणार नाही. तुम्ही न्यायालयाची दिशाभूल करू शकत नाही. माझी वैयक्तिक विश्वासार्हता



पणाला लागली आहे. मला प्रत्येकासाठी मानक नियमांचे पालन करावे लागेल. वारंवार एकच संदर्भ देण्याची ही प्रथा थांबवा. तुम्ही सगळे फक्त संधी घेण्याचा प्रयत्न करत आहात. पण मी ते करणार नाही. कारण माझी वैयक्तिक विश्वासार्हता धोक्यात आली आहे, असे सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी म्हटले. दरम्यान, खान उत्खननाशी संबंधित एक प्रकरण कालही खंडपीठासमोर सुनावणीसाठी आले होते. मात्र, एकाच प्रकरणात पुन्हा पुन्हा त्याच त्याच एका प्रकरणाचा उल्लेख करण्यावरून सरन्यायाधीश डी वाय चंद्रचूड यांनी ही टिप्पणी करत एकाच प्रकरणाचा अनेकदा उल्लेख न करण्यास सांगितले.




देशदूत
हे दैनिक मुद्रक व प्रकाशक **राजेंद्र कृष्णराव सोनवणे** यांनी श्रीरंग प्रकाशन प्रा.लि.यांच्याकरिता सकाळ मीडिया प्रा.लि., प्लॉट नं.सी-३, एम.आय.डी.सी.एरिया टेलिफोन एक्सचेंजसमोर, औरंगाबाद रोड, जळगाव-४२५००३ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करुन देशदूत कार्यालय, ई-७/९, व.वा.मार्केट (गोलाणी मार्केट) दुसरा मजला, नवी पेठ जळगाव येथे प्रसिध्द केले. ● **संपादक : हेमंत दिनेश अलोने*. फोन नं.**: जळगाव शहर कार्यालय-२२२८७८१, २२२४६६०, भुसावळ-२२०६८०, २२४७९५, रावेर-२५०४४४, धुळे-२३७९१४, फॅक्स-२३८९१४, नंदुरबार २२११०१. **RNI.No. 68337/1997** पोस्टाने पाठविण्याचा परवाना क्र. **JAL./123/2018-2020** (* पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.)